
बोकुडेन आणि योद्धा

एक जपानी लोककथा



रुपांतर: स्टीफन क्रेन्स्की


चित्रे: चेरिल कर्क नोल

बोकुडेन आणि योद्धा

एक जपानी लोककथा

मराठी अनुवादः सुशील मेन्सन





नावेतून प्रवास

सुकाहारा बोकुडेन हा एक उमराव माणूस होता. तो एक कुशल तलवारबहाद्दरही होता. त्याला जग जाणून घ्यायची जिज्ञासा होती. कित्येकदा, बोकुडेन प्रवास करण्यासाठी घर सोडून दूर निघून जात असे. तो अतिशय साधे कपडे घालत असे, इतर सहप्रवाशांसारखे. पण तो आपली तलवार नेहमी सोबत ठेवत असे. कारण काही ठिकाणी एकट्याने प्रवास करणे धोकादायक होते. प्रवासात नवनव्या ठिकाणी, नवनव्या लोकांकडून बोकुडेनला खूप काही शिकायला मिळत असे आणि त्याला शिकायची हौस तर होतीच!




प्रवास करताना एकदा तो एका विशाल नदीपात्राजवळ आला. नदीकाठावर एक नाव होती. ती लोकांना एका काठावरून दुसऱ्या काठावर पोहोचवत ये-जा करत होती.

प्रवासी नावेचे तिकीट काढण्यासाठी रांगेत उभे होते.
बोकुडेनही इतरांसारखंच तिकीट काढण्यासाठी रांगेत ऊभा राहिला.

तेवढ्यात, एक उग्र योद्धा रांगेत धक्काबुकी करत पुढे जायचा प्रयत्न करू लागला. तो अंगापिंडाने इतरांपेक्षा उंच आणि धिप्पाड होता.

"बाजूला हो," योद्धा म्हणाला. रांगेत पुढे असलेल्या एका गरीब शेतकऱ्याचा खांदा धरून तो म्हणाला, "तू माझ्या जागेवर उभा आहेस." योद्ध्याची वर्तणूक पाहून शेतकरी चकीत झाला. "मी मघापासून इथे उभा आहे. तुम्ही तर आत्ताच आलात," तो योद्ध्याला म्हणाला.





“बरोबर आहे तुझं,” योद्धा म्हणाला. “पण आता मी आलोय ना! मला तुझ्या जागेवर उभं राहायचंय.”

“हे योग्य नाही,” शेतकरी म्हणाला. “मी गेला तासभर इथे उभा आहे. तुम्ही एक सैनिक आहात. तुम्ही कायद्याचं रक्षण करायला नको का?”


“इथे मी बोलेन तोच कायदा!” योद्धा म्हणाला. “बरोबर बोललास तू. मी एक सैनिकच आहे. माझी तलवार दिसतच असेल तुला? आणि ती वापरतासुद्धा येतच असेल मला? काय वाटतं तुला? दाखवू का चालवून तुझ्यावर.... म्हणजे कळेल.”

शेतकरी कमरेतून खाली झुकला. योद्धा आपले ऐकणार नाही, हे त्याने ओळखले. “मी नि:शस्त्र आहे, काही विचार-बिचार न करता बोललो, क्षमा करा. तुम्ही माझ्या जागेवर उभे राहा.”

“हे छान झालं,” योद्धा म्हणाला. “तुला रांगेत उभं राहायला एवढं आवडतं तर रांगेच्या शेवटी जाऊन का उभा राहात नाहीस?“

नाईलाजाने शेतकरी योद्ध्याच्या म्हणण्याप्रमाणे रांगेच्या शेवटी जाऊन उभा राहिला.








नदी पार करताना

सगळी तिकिटे विकली गेली. प्रवासी नावेत चढून नदीपार जाऊ लागले.

स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता आणि बोकुडेन आल्हाददायक हवेचा आनंद घेत होता. तो एका जागी डोळे मिटून बसला.



थोडा वेळ गेला आणि उग्र योद्धा मोठ्या तोऱ्यात नावेमध्ये चालू लागला.

“बाजूला हो,” जवळच उभ्या असलेल्या शेतकऱ्याला तो म्हणाला.

“पण मी आधीपासून इथे उभा आहे,” शेतकरी म्हणाला.


“मला इथेच उभं राहून निसर्गाचा आनंद घ्यायचाय. माझी तलवार पाहिलीस का? मला ती वापरता येत असेलच, काय वाटतं तुला?”

शेतकरी कमरेतून खाली वाकला.

“मला कुठे उभं राहायचं यावरून वाद घालायचा नाही. मी दुसरीकडे जातो.”

आणि तो दूर जाऊन उभा राहिला.


आकर्षक कपडे घातलेल्या एका व्यापाऱ्याला योद्ध्याचे हे वर्तन आवडले नाही. “असं वागणं योग्य नाही,” तो म्हणाला. योद्धा त्याच्याकडे गेला आणि दरडावत म्हणाला, “कसं वागायचं हे तू मला शिकवणार का?”
“नाही, नाही,” व्यापारी घाबरत म्हणाला. “राहिलं, अशा छान कपड्यांत वाद घालणं मला बरं दिसत नाही.”
“मी तुझे लहानलहान तुकडे केले तर तू काय कपडे घातले होतेस, याने काही फरक पडणार नाही,“ योद्धा म्हणाला.
व्यापाऱ्याने आपला मऊशार सदरा घट्ट पकडून ठेवला. “क्षमा करा,” तो म्हणाला. “मला माझ्या बोलण्याचा पश्चाताप होतोय.”
“मी तुझी जीभ कापली असती तर अशी पश्चाताप करण्याची वेळ आली नसती तुझ्यावर!” योद्धा म्हणाला.



व्यापारी लगबगीने योद्ध्यापासून दूर गेला.

“तुम्ही सगळे भेदरलेल्या कोंबडीच्या पिल्लांसारखे आहात,” योद्धा ओरडत म्हणाला. “तुम्ही सगळ्यांनी रांगत तुमच्या सुरक्षित अंड्यांमध्ये शिरलं पाहिजे.”

प्रवासी योद्ध्यापासून अंतर राखून उभे राहिले, फक्त बोकुडेन सोडून. त्याचे डोळे मिटलेले होते आणि तो स्तब्ध बसला होता.



योद्ध्याने आपली तलवार म्यानातून काढून हवेत फिरवली. तो तलवार वर-खाली, उजवी-डावीकडे चालवू लागला. मध्येच तो हवेत वार करू लागला.

“तुम्ही सगळे माझ्याकडे रोखून का बघताय?” त्याने विचारले. “कुणाला काही बोलायचं आहे का?”


दोन मुलांनी हात वर केले.

“बोला, काय म्हणायचंय तुम्हाला?” योद्ध्याने विचारले.

“तुम्ही बरीच युद्धं केली असतील ना?” एका मुलाने विचारले.

योद्धा मान डोलावत म्हणाला.

“बरीच, मोजता येणार नाहीत इतकी.”




“तुम्ही कधी जखमी झालात?” दुसऱ्या मुलाने विचारले.


“मी जखमा करतो, करून घेत नाही,” कुणीतरी फुसफुसले.

रागाने योद्धा आजूबाजूला पाहू लागला.

“कोण बोललं?” त्याने विचारले.

कुणीच बोलले नाही.





एक वेगळी कला

सभोवतालच्या शांततेने योद्धयाचे समाधान झाले नाही.

“माझी नक्कल कुणी केली, ते मी नक्की शोधून काढीन. जो कुणी असेल त्याला त्याची भारी किंमत चुकवावी लागेल.”

पुन्हा कुणीतरी फुसफुसले.

मग योद्धा थेट बोकुडेनकडे गेला.

त्याने उमरावाच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. “अच्छा! तू आहेस तर!” योद्धा उद्गारला.

बोकुडेनचे डोळे मिटलेलेच होते.

“ए, मी तुझ्याशी बोलतोय,” योद्धा म्हणाला.

त्याने आपली बोटे बोकुडेनच्या खांद्यावर दाबली.

बोकुडेनने डोळे उघडले.
“किती सुंदर स्वप्न पाहात होतो मी!” तो म्हणाला. “त्याचा शेवट काय होता, हे तू मला सांगशील का आता?”



योद्धा मोठमोठ्याने हसू लागला.
“मला काय करायचंय तुझ्या स्वप्नाशी? नावेतल्या इतर किड्यांपेक्षा तुझा कणा जास्तच ताठ दिसतोय. माझं तलवारबाजीचं कौशल्य पाहिलंस का?” "
“माफ करा मला,” बोकुडेन म्हणाला.
“तुम्ही तलवारबाजीच्या कसरती करून दाखवत होता का? खरंच, माझं लक्ष नव्हतं.”



“मग आता लक्ष देऊन बघ,” योद्धा म्हणाला,

आणि तो तलवार हवेत चालवू लागला,

त्याच्या सर्वोत्तम कसरती दाखवू लागला.

हे दाखवून झाल्यावर तो बोकुडेनकडे वळला. “कशी वाटली माझी तलवारबाजी?” त्याने बोकुडेनला विचारले.

“खूपच सामान्य,” बोकुडेन म्हणाला.


“सामान्य!” योद्धा मोठ्याने ओरडला.

“का? शंभरातल्या एखाद्याकडेच असं कौशल्य असतं!”

बोकुडेनने आजुबाजूला पाहिले.

“इथे शंभर लोक दिसत नाहीत. त्यामुळे तुझं म्हणणं मला मान्य कराव लागेल.”





योद्ध्याने बोकुडेनला बोट दाखवून इशारा दिला.

“पण तूसुद्धा तलवारबहाद्दर आहेस. की फक्त सजावटीसाठी तलवार घेऊन फिरतोस?”

बोकुडेनने शांतपणे त्याच्याकडे पाहिले.

“मी तुझ्यापेक्षा वेगळी कला शिकलोय. माझा हेतू दुसऱ्यांना हरवणं नाही तर स्वतःचं रक्षण करणं हा आहे. हे म्हणजे, तलवार न वापरताच लढण्यासारखं आहे.”

योद्धा हसू लागला.

“मी असं काही कधी ऐकलं नाही. ही कला शिकून काय मिळवलंस तू?”


बोकुडेनने आपले दोन्ही हात पसरून वर उचलले.

“बरंच काही मिळवलंय.”

योद्धा पुन्हा हसू लागला.

“मी तुझी तलवार न चालवताच होणारी लढाई पाहायला उत्सुक आहे.”

“ठीकाय,” बोकुडेन म्हणाला.



बोकुडेन सभोवताली जागा शोधू लागला.
“या नावेवर पुरेशी जागा नाही लढाई करायला. आपण छोटी नाव घेऊन त्या बेटावर जाऊ.”
बेटाकडे बोट दाखवत बोकुडेन म्हणाला.

“तिथे बऱ्यापैकी जागा दिसतेय.”
योद्ध्याने मान्य केले.
नावेत बसलेल्या इतर प्रवाशांनाही या लढाईचे कुतूहल वाटू लागले
बोकुडेन आणि योद्धा छोट्या नावेतून बेटाकडे निघून गेले.





एकाच तलवारीची लढाई

बोकुडेन आणि योद्धा बेटावर पोहोचले. योद्ध्याने नावेतून किनाऱ्यावर उडी मारली. त्याला लढाई करण्याची घाई झाली होती. तो तलवार हवेतच चालवून त्याची खुमखुमी दाखवू लागला.

सूर्यप्रकाशात त्याच्या तलवारीचे पाते तळपू लागले. मोठ्या नावेतले प्रवासी अवाक् होऊन त्याच्याकडे पाहू लागले.

योद्धा खरोखरच अत्यंत उग्र दिसत होता. त्याची तलवार विजेसारखी लखलखत होती. त्याच्यासमोर हा अनोळखी शांत माणूस कसा टिकणार, असे वाटू लागले.

योद्ध्याच्या मनातही असेच काहीसे विचार चालले होते. पण एक गोष्ट मात्र त्याच्या नजरेतून निसटली.

बोकुडेन त्याच्या मागोमाग किनाऱ्यावर उतरला नव्हता.



तो अद्याप बोटीतच बसून होता.

“चल लवकर,” योद्धा म्हणाला. “फार वेळ नाही लागायचा लढाई संपायला. मी तुला दया दाखवेन असं वचन देऊ शकत नाही. पण मी लढाई खात्रीने लवकर संपवेन.”



उत्तरादाखल बोकुडेनने नाव पुन्हा पाण्यात लोटली.

“कुठे चाललास तू?” योद्धा किंचाळला.


“मोठ्या नावेवर,” बोकुडेन उत्तरला.

योद्धा मोठमोठ्याने हसू लागला.

“पण आपण लढलोय कुठे अजून? एवढा भ्याड आहेस का तू?”

“सुकाहारा बोकुडेन बरंच काही आहे,” बोकुडेन म्हणाला.

“माझ्या सगळ्याच गोष्टी कौतुकास्पद नाहीत. पण मला कुणी आजवर भ्याड म्हटलं नाहीये.”



मोठ्या नावेवरचे प्रवासी खुश झाले. सुकाहारा बोकुडेन हा जपानमधील सर्वात महान तलवारबहाद्दर होता. आपला जीव वाचवण्यासाठी तो बढाईखोर योद्ध्याशी लढला नाही, असं नव्हतं.

“याला म्हणतात, तलवार न चालवता लढाई करणं,” बोकुडेन योद्ध्याला म्हणाला.

“आता तू जेवढा चांगला योद्धा आहेस, तेवढंच चांगलं पोहोता यायला हवं तुला. नाहीतर तुला आमच्याकडून हा पहिला धडा मिळाला आहे, असं समज.”

समाप्त

